IMPACT FACTOR:4.197(IIJIF)
ISSN: 2454-5503

# CHRONICLE
## OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

VOL. 6 SPECIAL ISSUE 4 AUGUST 2020
A Bimonthly Peer Reviewed International Journal



अण्णा भाऊ साठे
जन्मशताब्दी विशेषांक

*मुख्य संपादक*
डॉ. कल्याण गांगर्डे

अतिथि संपादक :
डॉ. राजू बडुरे | डॉ. आशा गिरी

*Mahatma Gandhi Education and Welfare Society's*
CENTRE FOR HUMANITIES AND CULTURAL STUDIES, KALYAN (W)
*www.mgsociety.in +91 8329000732 Email: chcskalyan@gmail.com*

# अनुक्रमणिका

१. मराठी साहित्यातील शिरोमणी : अण्णा भाऊ साठे | डॉ. संतोष हंकारे |०७

२. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील तत्त्वज्ञान | डॉ. विठ्ठल भंडारे |१२

३. अण्णा भाऊ साठेंच्या साहित्यामधील साम्यवादी विचारप्रर्वतन | डॉ विठ्ठल जंबाले |२१

४. आंबेडकरवादी साहित्यिक अण्णाभाऊ साठे | डॉ. कीर्तीकुमार मोरे |२७

५. अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील आंबेडकरी विचाराचा प्रभाव | डॉ.कहाळेकर सी.एम./ डॉ.अडकीने एस.बी. |३३

६. साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या वाङ्मयातील आंबेडकरवाद | प्रकाश उ. हनवते |४२

७. अण्णा भाऊ साठेंचे मराठी साहित्यातील योगदान |डॉ. बडुरे राजू सा.|४७

८. अण्णा भाऊ साठेंचा वाङ्मयीन दृष्टिकोन | भोपे प्रल्हाद द. |५४

९. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील आशय विविधता | डॉ. ज्ञानेश्वर खिल्लारी |५८

१०. अण्णा भाऊ साठे : मराठी साहित्यातील अव्दितीय साहित्यिक | डॉ. रवींद्र वै. बेम्बरे | ६१

११. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील मुल्यदर्शन| डॉ.मनोहर सिरसाट |६७

१२. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे : एक संघर्षशील व्यक्तिमत्व | संतोष बा. गालफाडे |७१

१३. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील समाजवास्तव आणि सामाजिक मूल्यांचा समाजशास्त्रीय अभ्यास | डॉ. एस. के. राठोड |७५

१४. अण्णाभाऊ साठे आणि सामाजिक परिवर्तन एक समाजशास्त्रीय अभ्यास | डॉ. विश्वनाथ मा.सुर्यवंशी | ८२

१५. अण्णाभाऊ साठे यांचे सामाजिक, आर्थिक व राजकीय विचार | डॉ.आर.के. काळे |८८

१६. साहित्य शिरोमणी अण्णा भाऊ साठेंच्या वाङ्मयातील सामाजिक परिवर्तनवादी विचार | सिध्दार्थ कुं. इंगोले |९५

१७. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याची लेखनशैली | संतोष र.कांबळे |१००

१८. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील ग्रामीण जीवन | डॉ.एम.एफ.राऊतराहे |१०४

११.

# अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील मुल्यदर्शन

**प्रा.डॉ. मनोहर सिरसाट**
सहयोगी प्राध्यापक आणि विभागप्रमुख,
पदवी आणि पदव्युत्तर मराठी विभाग
बलभीम महाविद्यालय, बीड
भ्रमणध्वनी : ९४२२६५२९३४

समतेचा विचार प्रज्वलित करून विषमतेविरूध्द एल्गार पुकारणारे अण्णा भाऊंचे विचार हे त्यांच्या साहित्याच्या माध्यमातून आविष्कृत होतांना दिसतात. समाजमामध्ये असणारी जातवर्चस्व आणि श्रेष्ठ कनिष्ठत्वाच्या भावनेतून आलेला मानवी वर्तन आणि व्यवहार हा पाशवी आणि क्रुर पध्दतीचा असल्याचे अण्णा भाऊ जेव्हा पाहतात त्यावेळी ते अस्वस्थ होतात. आणि मानवतेचा विचार ते आपल्या संबंध साहित्यामधून प्रस्तूत करून समाजाला दिशादिग्दर्शन करतांना पहावयास मिळतात. समाजपरिवर्तनाचे एक शस्त्र म्हणून अण्णा भाऊ साहित्याचा अत्यंत प्रभावी पध्दतीने वापर करतांना दिसतात. कारण अण्णा भाऊ हे कार्यकर्ते लेखक आहेत, त्यामुळे त्यांना इथला माणूस आणि त्याचे सामाजिक प्रश्न अधिक महत्त्वाचे वाटतात. त्या प्रश्नांच्या मुळाशी ते जाऊ पाहतात. प्रश्नांची उकल करू पाहतात, त्यासाठी म्हणून ते साहित्याचा वापर करतात. अण्णा भाऊंनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ, त्यांचे कर्तृत्त्व आणि विचार जवळून पाहिले होते. त्यामुळे त्यांच्यावर या सर्व बाबींचा मोठा प्रभाव पडलेला होता. म्हणूनच त्यांच्या साहित्यातून समताधिष्ठित समाजव्यवस्थेचा विचार प्रतिबिंबित होतांना दिसतो.

अण्णा भाऊंनी आपल्या संपूर्ण साहित्यातून चेहरा नसलेल्या आणि त्यांचे अस्तित्व नाकारल्या गेलेल्यांना आपल्या साहित्यातून नायकत्व देऊन इथल्या उपेक्षित, कष्टकरी, वंचित आणि श्रमिकांच्या मुक्तीचा विचार मांडला आहे. माणसांना प्रतिष्ठा देऊन मानवतेचे मूल्य पेरणारा विचार ते आपल्या साहित्यकृतींमधून मांडतात. म्हणूनच मूल्य प्रदान करणाऱ्या या साहित्याचे जगभरातील भाषांमधून भाषांतर झाले आहे. जगण्याची प्रेरणा निर्माण करणारे अण्णा भाऊंचे साहित्य जागतिक साहित्याचा अनमोल ठेवा आहे. आजपर्यंत साहित्यातील नोबेल पुरस्कार हे सर्वहारा, नाही रे वर्गाचे प्रतिनिधित्त्व करणाऱ्या साहित्यकृतीला मिळाल्याचे आपल्याला पहावयास मिळते. अण्णा भाऊंचे साहित्य

याच वर्गाचे प्रतिनिधित्त्व करते. मात्र अण्णा भाऊ नोबेल पासून तर कोसो दूर राहिले. त्यांच्या साहित्यकृतींमुळे त्यांचा फार मोठा सन्मान होणे अपेक्षित असतांना मात्र त्यांच्या वाट्याला कायम उपेक्षा आली, ही मोठी शोकांतिका आहे.

शील, स्वाभिमान आणि स्वातंत्र्य यांची जपवणूक करून आपल्या साहित्यकृतींमधून त्या मूल्यांची प्रतिष्ठापना करून समाजपरिवर्तनाचा विचार अण्णा भाऊंचे साहित्य प्रस्तृत करते. अण्णा भाऊंचे समग्र जीवनच संघर्षाचे आहे, म्हणून त्यांच्या साहित्यातूनही संघर्षाचाच प्रत्यय येतो. म्हणून अण्णा भाऊंचे दुसरे नावच सामाजिक परिवर्तन असे आहे, हे त्यांच्या साहित्यातून पदोपदी पहावयास मिळते. समता, स्वातंत्र्य, बंधुत्व आणि सामाजिक न्याय या मूल्यविचारांचा प्रभाव अण्णा भाऊंच्या साहित्यावर आहे. एकूणच अण्णा भाऊंची लोकशाही मूल्यांवर अपार निष्ठा आहे. त्यामुळेच अण्णा भाऊंचा फकिरा हा बाबासाहेबांच्या विचारांची पूजा करतो आहे. त्याप्रमाणे कृती करतो. माळकन्याच्या मठकऱ्याला लुटून फकिरा सर्वांना समान पध्दतीने धान्य वाटून देतो. कुणालाही कमी–अधिक जाऊ नये म्हणून स्वत: लक्ष ठेवतो आणि समतेचा प्रत्यय देतो. बेडसगावचा खजिना लुटल्यानंतर वाटण्या करण्यापूर्वी दोन भाग काढून घेतो. एक भाग मांग वाडयात तर दुसरा भाग महारवाडयात देतो आणि बाकीची रक्कम सर्वांना वाटतो. या प्रसंगामधून सामाजिक बांधिलकी प्रतित होतांना दिसते.

बेडसगावच्या लुटीमुळे महार–मांग वाडयातील काही लोकांना संशयित म्हणून इंग्रज अधिकारी अटक करतात. छावणीत डांबून ठेवतात. हे ऐकून फकिरा अस्वस्थ होतो. अटक असणाऱ्या या सर्वांना सोडण्यासाठी स्वत: पोलिसांच्या स्वाधीन होतो, आणि त्या सर्वांची मुक्तता करतो. ही फकिराची कृती बंधुता आणि स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारी आहे. लोकशाही मूल्यविचारांची रूजूवात करणारी आहे.

बेडसगावचा खजिन्याची लूट करतांना रघू बामण हा आपल्या बायका–पोरं ज्या खोलीत आहेत, त्या खोलीसमोर उभा राहतो. खजिन्यापेक्षा त्याला आपले कुटूंब आणि त्याची अब्रू अधिक महत्त्वाची वाटते, ही बाब फकिराला अधिक भावते. या लूटीच्या वेळी त्याच्या घरातील महिला हया अंगावरील सोने काढून देऊन आर्जव करतात, त्यावेळी फकिरा म्हणतो, आम्ही खजिना लूटण्यासाठी आलो आहे, ओरबडण्यासाठी नाही. स्त्रियांच्या अंगावरील सोन्याला हातही न लावता आणि त्या महिलांच्या अब्रूचे रक्षण करणारा फकिरा हा स्त्रियांचा सन्मान करणारा आणि शीलाची पूजा करणारा महान क्रांतीकारक वाटायला लागतो. त्याच्याविषयीचा गूंड म्हणून असणारा दृष्टीकोन हा मानवतेच्या

पातळीवर जाणारा आहे. त्याच्याविषयीची सहानुभूती निर्माण करणारा असाच आहे.

साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे हे आपल्या वैजयंता कादंबरीच्या प्रस्तावनेत आपली भूमिका मांडतांना म्हणतात, जो कलावंत जनतेची कदर करतो, त्याचीच कदर जनता करते. हा देश सुखी व्हावा, समृध्द आणि सभ्य व्हावा, इथे समानता नांदावी, या महाराष्ट्र भूमीचे नंदनवन व्हावे, अशी मला रोज स्वप्न पडतात. ती मंगल स्वप्न पाहत मी लिहित असतो. ही अण्णा भाऊंची भूमिका मानवतावादाचा प्रत्यय देणारी अशीच आहे. या समाजात समानता नाही विषम व्यवहार पदोपदी पहावयास मिळतो म्हणून अण्णा भाऊ या देशात समानता यावी, ती नांदावी, येथे नंदनवन व्हावे, अशी स्वप्ने पाहतात. अर्थात समताधिष्ठित समाजनिर्मिती हे अण्णा भाऊंचे मोठे स्वप्न होते, आणि तोच विचार ते आपल्या साहित्यकृतीतून मांडतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी प्रभावित होऊन जून्या अनिष्ठ रूढी, परंपरा आणि विषमतेच्या मुळावर घाव घालण्याचे आवाहन करतांना अण्णा भाऊ म्हणतात,

'जग बदल घालूनी घाव, सांगूनी गेले मज भीमराव' या क्रांतीगीतामधून त्यांची साहित्यविषयक दृष्टीही अधिक स्पष्ट होते. अण्णा भाऊंच्या साहित्यातील नायिका हया प्रचंड करारीबाण्याच्या आणि स्वाभिमानी आहेत. समाजासमोर एक आदर्श म्हणून हया नायिका अण्णा भाऊ उभ्या करतात. त्या दरिद्री आहेत, मात्र स्वतःच्या चारित्र्याला जपणाऱ्या आहेत. पारंपारिक पध्दतीच्या आणि तसा विचार करणाऱ्या महिलांना अण्णा भाऊ आपल्या साहित्यातून नायकत्त्व देत नाहीत. स्त्रियांनी सर्व अन्याय–अत्याचार हे नशिबाचा भोग म्हणून सहन करावे, याला फाटा देत आक्रमक नायिका उभ्या केल्या आहेत. अर्थात त्यांनी स्त्रीचित्रणाची परंपरागत असणारी शैली साफ नाकारून नवा विचार आणि कृती करणारी शैली आपल्या साहित्यातून मांडली. अर्थात एका दृष्टीने अण्णा भाऊंनी स्त्रियांचा सन्मान करीत त्यांना सर्वप्रथम 'माणूस' म्हणून प्रतिष्ठित करण्याचे अत्यंत महत्त्वाचे असे काम केले आहे. हे काम मानवतेचे आहे. वैर मधील गुणा, कुरूप मधील हरणा हया स्वतःचे शील जपण्यासाठी विद्रोह करतात. एवढेच नाही तर अन्याय करणाऱ्यांना मारून टाकण्याचे हिम्मत दाखवतात. वारणेच्या खोऱ्यात मधील मंगला, माकडीचा माळ मधील दुर्गा, चंदन मधील चंदन, चित्रा मधील चित्रा, आवडी हया नायिका अन्यायाविरूध्द बंड करतात. पारंपारिक स्त्रियांसारखे अन्याय सहन करणाऱ्या नाहीत, हे प्रामुख्याने निदर्शनास येते.

लेखकाची लेखनविषयक भूमिका कशी असली पाहिजे, त्यांनी काय लिहिले पाहिजे, कोणती भूमिका घेतली पाहिजे यासंदर्भात दिनांक २ मार्च १९५८ मध्ये झालेल्या अखिल भारतीय दलित साहित्य संमेलनाच्या उद्घाटनपर भाषणात जी भूमिका अण्णा भाऊंनी मांडली आहे, ती अत्यंत महत्त्वाची आणि दिशादर्शक आहे. त्यामध्ये अण्णा भाऊ म्हणतात, 'एका झाडाखाली तीन दगडांची चूल करून, मडक्यात अन्न शिजवून दोन मूलं आणि बायको यांना जागविणारा हा दलित वरवर कंगाल दिसतं असला तरी त्याची संसार करण्याची इच्छा केव्हाही पवित्रच असते. कुटूंबसंस्थेवरील असणारा त्याचा विश्वास प्रबळ आहे. मात्र त्याची ही कंगाल अवस्था भांडवली व्यवस्थेने करून त्याला झाडाखाली हाकलून दिले आहे. याची कारणपरंपरा शोधून मग त्या कंगालाविषयी लिहावे. जपून लिहावे. कारण तो कष्टकरी आहे. तो श्रम करतो. त्याचे जगणे सुंदर करण्यासाठी सहाय्यभूत ठरणारी अशी भूमिका घेण्याचे आवाहन अण्णा भाऊ करतात. अण्णा भाऊंची ही समाजशास्त्रीय चिकित्सा समाजव्यवस्थेचे दाहक चित्रण करणारी आहे. लिहिणाऱ्यांच्या डोळयात अंजन घालणारी आहे. लेखकांनी या पध्दतीने विचारपूर्वक आणि जपून आपली लेखनी चालविली पाहिजे, हा विचार मांडतात.

श्रमाला प्रतिष्ठित करून नवी मांडणी करण्याचा प्रयत्न अण्णा भाऊंनी आपल्या विचारांमधून केला आहे. परंपरेने चालत आलेला रूढीवादी विचार नाकारून 'हे जग, ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर नसून दलित, कष्टकरी यांच्या तळहातावर तरलेली आहे'' हा नवा विज्ञाननिष्ठ विचार अण्णा भाऊ मांडतात. दलित हा गुलाम नाही, हे जग त्याच्या हातावर आहे, याची जाणिव करून साहित्यिकांनी लेखन करावे. त्याचे जीवन वरच्या पातळीवर नेण्याची शिकस्त करावी, ही अण्णा भाऊंची भूमिका मानवतावादाचा पुरस्कार करणारी, तो विचार समाजात रूजावा यासाठी प्रयत्न करणारी अशीच वाटते.

## संदर्भ ग्रंथ सूची


१) वैजयंता – अण्णा भाऊ साठे
२) समग्र अण्णा भाऊ साठे वाङ्मय – महाराष्ट्र शासन प्रकाशित
३) लोकराज्य – १ नोव्हेंबर १९९३ चा अंक
४) अण्णा भाऊ साठे : समाजजीवन आणि साहित्य विवेचन – डॉ. बाबुराव गुरव, लोकवाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई जुलै १९९९
५) सत्यशोधक अण्णा भाऊ साठे – संपादन शौर्य प्रकाशन, लातूर, डॉ. मनोहर सिरसाट


□□□